# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/०५/२०१८
## दि.२४/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे २६३/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १७९,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | शाहरुख खान, वय १८ वर्षे,रा.कोंढवा खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी कारवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०५/२०१८ रोजी रात्रौ २०/३० वा.चे सुमारास इंदिरा कॉलेज मुंबई-बेंगलोर हायवे पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे वडिल रौफ रहिम खान,वय ४३ वर्षे,रा.सर्व्हे नं.५२ गल्ली नं.३० मक्का मस्जिद भाग्योदय नगर,कोंढवा खुर्द,पुणे हे रिक्षा रोडचे कडेला थांबवुन लघुशंकेसाठी रस्ता क्रॉस करुन रिक्षाकडे परत येत असताना कार चालकाने त्यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून, त्यांना ससुन हॉस्पिटल येथे औषधोपचारासाठी ॲडमिट केले असताना ते दि.२२/०५/२०१८ रोजी पहाटे ०३/१० वा.चे सुमारास मयत झाले आहे. कार चालक अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एल.गवारी ९८२३०१७१६९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे  १८०/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | उदय जोशी, वय ४२ वर्षे,रा.कसबा पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०५/२०१८ रोजीचे रात्रौ २२/०० वा.ते दिनांक २४/०५/२०१८ रोजीचे सकाळी ०९/०० वा.चे दरम्यान ग्राहक पेठ, सदाशिव पेठ, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरट्याने रोख रक्कम ३० हजार ४००/-रुपये व सोन्याची नाणी, सीसीटीव्ही कॅमेरा, डी.व्हि.आर.मशिन असा एकुण २ लाख २९ हजार रुपय किंमतीचा ऐवज फिर्यादी काम करीत असलेल्या ग्राहक पेठचे इमारतीचे खालील मजल्यावरील ग्रॉसरी विभागाचे पाठीमागील बाजुस दरवाजाचे खालील बाजुस असणा-या फटीमधुन किंवा ग्राहक पेठच्या दुस-या मजल्यावरील टेरेसवर केलेल्या ग्रिलच्या एका बाजुस उघड्या असलेल्या जागेमधुन प्रवेश करुन घरफोडी चोरी करुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संजय गायकवाड  ९८२३९३८५५१. |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १००/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | गणेश गवारी,वय २७ वर्षे,रा.पर्वती दर्शन,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०१८ रोजी सायं.१९/३० वा.ते दि.२२/०५/२०१८ रोजी सकाळी १०/०० वा.चे सुमारास आपले सरकार सेवा केंद्र पंचायत समिती, हवेली,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पंचायत समिती हवेली,जि.पुणे येथे तालुका व्यवस्थापक म्हणुन नोकरीस असुन, फिर्यादी यांचे कार्यालयातील एकुण तीन संगणक ४८ हजार रु.किंमतीचे फिर्यादी यांचे कार्यालय पंचायत समिती हवेली,जि.पुणे आपले सरकार विभाग येथुन वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे कार्यालयाचे लाकडी दरवाजाचे कडी कोयंडा उचकटुन आत प्रवेश करुन, फिर्यादी यांच्या संमतीशिवाय, लबाडीच्या इराद्याने चोरुन घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.यु.कापुरे ९४०४९९०५३५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे  २३३/१८,भादविक ४५४,४५७,३८०,५११ |
| **फिर्यादी** | प्रणव देशपांडे वय-२५ वर्षे,रा.गोखलेनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०१८ रोजी २२/३० वा.ते  दि.२४/०५/२०१८ रोजी ०९/३० वा.चे दरम्यान बी/२ छत्रपती को.ऑ.हौसिंग सोसायटी, पत्रकारनगर जवळ, गोखलेनगर, पुणे व फ्लॅट नं. बी/७ व बी/८, चाणक्य को ऑ. हौसिंग सोसा. परिमल उद्यान शेजारी, भाभा हॉस्पीटलच्या समोर, शिवाजीनगर,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहते रुमच्या दरवाज्याचे लॉक कशाचे तरी सहाय्याने तोडुन रुममध्ये प्रवेश करुन, रुममध्ये असलेल्या बॅग मधुन २४ हजार रुपये रोख रक्कम घरफोडी चोरी करुन, चोरुन घेवुन गेला आहे. तसेच १)संदीप सातव,यांचा फ्लॅट नंबर अे/१ याचे राहते घराचा मुख्य दरवाजा, २)नानासाहेब बोथे यांचा फ्लॅट नंबर अे/२ चे पार्किगमधील स्टोअर्स रुमचा कडी कोयंडा, ३)प्रताप शिवलिंग भोसले,रा.फ्लॅट नं. बी/८, चाणक्य को ऑ. हौसिंग सोसा. परिमल उद्यान शेजारी,भाभा हॉस्पीटलच्या समोर, शिवाजीनगर, पुणे ४)राहुल जाधव,रा.फ्लॅट नं. बी/७,चाणक्य को ऑ. हौसिंग सोसा.परिमल उद्यान शेजारी,भाभा हॉस्पीटलच्या समोर,शिवाजीनगर,पुणे यांचे फ्लॅटचा सुध्दा कडी कोयंडा तोडुन घरफोडी चोरीचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पी.एस.टिळेकर  ७७५८९९२२२७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २३५/१८,भादविक ४३६,३४ |
| **फिर्यादी** | अलका चांदणे,वय २८ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | चार इसम, (संशयीत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०४/२०१८ रोजी सायं.१७/३० वा.चे सुमारास २११ खैरेवाडी गणेशखिंड रोड पुणे. |
| **तपशिल** | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी दि.२५/०४/२०१८ रोजी खैरेवाडीतील घरी भावाचे कपडे आणायला गेल्यावर त्यांचे घराचे कोणीतरी नुकसान करण्याचे इरादयाने कशाचे तरी सहाय्याने जाळले आसल्याचे दिसले. परंतु सदर घर हे फिर्यादी यांचे वस्तीत राहणारे चार इसम यांनी नुकसान करण्याचे इरादयाने कशाचे तरी सहाय्याने जाळले असावे असा संशय आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.आर.शिंदे ९१५६७७६१९६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे  १७०/१८,भादविक ४२७ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधि.१९८४ चे क. ३ |
| **फिर्यादी** | आर.पी.क्षिरसागर, पो.शि.वारजे पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १.जाम्या उर्फ जेम्स संजय वाघमारे,वय २२ वर्षे,रा.अनुंजा अपार्टमेंट,आंनद नगर,सिंहगड रोड पुणे  २.विठ्ठल सदाशिव पडवळ,वय २३ वर्षे,रा.न-हेगांव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०१८ रोजी २०/३० वा.चे सुमारास रामनगर चौकी,वारजे,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील नमुद रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे-जाम्या उर्फ जेम्स वाघमारे व विठ्ठल पडवळ यांनी रामनगर चौकीचे टेबलावरील काच कशाचे तरी सहाय्याने फोडून सार्वजनिक मालमत्तेचे एकुण १ हजार रू.किंमतीचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निकम ९८२३२०७७४६ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे  ६१५/१८,भादविक ४६५,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | शैलेश चारभे,वय ५० वर्षे,रा. कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | १)उत्तम श्रीपती खंडगळे २)एक महिला,दोघे रा.वेताळबाबा वसाहत,हडपसर,पुणे(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि १३/०५/२००९ ते दि.०४/०१/२०११ रोजी पर्यंत ग्लायडिंग सेंटर हडपसर, पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे ग्लायडींग सेंटर डी.जी.सी.ए. येथे प्रभारी अनुदेशक म्हणुन नियुक्त असुन दि.१३/०५/२००९ ते दि.०४/०१/२०११ पर्यंत इसम नामे-उत्तम श्रीपती खंडगळे व त्यांची पत्नी यांना ग्लायडींग सेंटर येथे तात्पुरत्या स्वरुपात रोजनदारीने माळी काम करण्यासाठी कामास ठेवले असता त्यांनी फिर्यादी यांचे नावाचे तसेच प्रशासनिक अधिकारी अरिंदम डे यांचा खोटा शिक्का मारुन त्यावर त्यांच्या खोट्या सह्या करुन त्याद्वारे खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन फिर्यादी व सरकारची फसवणुक केलेली आहे. यातील नमुद इसम व महिला यांनी सदर खोट्या बनावट कागदपत्रांचे आधारे नोकरीवर रुजु करुन घ्यावे याकरीता मा.रिजनल लेबर कोर्टामध्ये दावा दाखल करुन,कोर्टाची दिशाभुल करुन फसवणुक केलीली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.पी.भांगे ८८०५३३३०३३ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १३५/१८,भादविक ४०६,४१९,४२० माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ५९ वर्षे,रा.मुंढवा,पुणे |
| **आरोपी** | निरज प्रभाकर टिळक,वय ४५ वर्षे,रा.६३४/३५ अमरपार्क केळकर रोड लोखंडे तालीमाजवळ नारायण पेठ, पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | जानेवारी २०१७ ते आज रोजी पर्यंत फिर्यादी यांच्या राहते घरी |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसम-निरज टिळक हा एच.डी.एफ.सी. बँकेत कॅशिअर पदावर काम करत असताना त्याने फिर्यादी यांचा विश्र्वास संपादन करुन, त्याचे बिझनेसच्या आर्थिक व्यवहारासाठी मदत करतो असे सांगुन त्याच्या एच.डी.एफ.सी.बॅकेतील सहा चेकवर सहया करुन घेवुन, तसेच फिर्यादी यांचे बॅक अकाऊंट वरुन एकुण रक्कम रुपये ०१ कोटी ८८ लाख रुपये हे त्याचे एच.डी.एफ.सी बॅकेतील अकाऊंटवर फिर्यादी यांच्या सहमती शिवाय ट्रान्सफर करुन, फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली तसेच फिर्यादी यांच्या परवानगीशिवाय त्याच्या बॅक अकाऊंटला त्याचे मेल आयडी लिंक केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. गजानन पवार,९१५८५२०००२ सायबर क्राईम सेल, पुणे शहर |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**